Impact Factor : 3.0498

ISSN - 2348-2702

# Apoorv Knowledge

International Journal of Multidisciplinary Research
Peer Reviewed
Vol.-II

## One Day Multidisciplinary National Conference
## on
## Indian Society : Problems and Solutions

**Organized by**

Shri. Dnyaneshwar Shikshan Sanstha's

**Shivchharapati Arts College, Pachod**

Tq. Paithan, Dist. Aurangabad (M.S.)

**on**

**2nd March 2019**

◈ EDITOR-IN-CHIEF ◈

Dr. Vandana Namdeo Bankar

◈ EDITOR ◈

Dr. Hariprasad Bidve    Dr. Uttam Jadhav

◈ EDITORIAL BOARD ◈

Dr. Santosh Chavhan    Prof. Hemantkumar Jain.
Prof. Tukaram Gawande    Prof. Vinod Kamble
Prof. Sachin Kadam

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 52 | मराठी कादंबरीवरील जागतिकीकरणाचा परिणाम<br>प्रा. डॉ. सदाशिव सरकटे | 176 |
| 53. | जागतिकीकरणानंतर उच्च शिक्षणाची झालेली दशा व दिशा<br>प्रा. डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे | 179 |
| 54. | भटक्या विमुक्तांच्या साहित्याची सामाजिक पार्श्वभूमी<br>प्रा. डॉ. गजानन पांडुरंग जाधव | 182 |
| 55. | स्त्रीवादी साहित्याची संकल्पना<br>डॉ.यशोद श्रीमंतराव पाटील | 184 |
| 56. | दलित साहित्य चळवळ आणि भारतीय समाज<br>डॉ.आहिरे भास्कर मुरलीधर | 186 |
| 57. | जोतीराव फुलेंच्या विचारांचा अन्वयार्थ<br>प्रा.डॉ.काळे बी.एम. | 190 |
| 58. | धरणग्रस्तांच्या दुःखाची गाथा- झाडाझडती<br>प्रा.डॉ.मधुकर बैकरे | 193 |
| 59. | 1990 नंतरचे ग्रामीण कादंबरी लेखन<br>प्रा. डॉ. संतोष चव्हाण | 196 |
| 60. | महात्मा फुले यांचे साहित्य आणि समाज<br>प्रा. शिवाजी सिरसाठ | 199 |
| 61. | 'ग्रामोध्दाराचे अभंग'- ग्रामीण सामाजिक समस्या आणि उपाय<br>डॉ.संतोष शिवनाथ कानडे | 201 |
| 62. | मानवी जीवन : वाचन संस्कृती<br>प्रा.डॉ.तोटे दादासाहेब सर्जेराव | 203 |
| 63. | मराठी संत साहित्य आणि सामाजिक समस्या<br>प्रा. शेख आरिफ ताजुद्दीन | 205 |
| 64. | जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितांवर पडलेला प्रभाव<br>सहा. प्रा. ढास रविंद्र बाबासाहेब | 207 |
| 65. | महात्मा फुले यांच्या साहित्याने भारतीय समाज व्यवस्थेवर केलेला सकारात्मक परिणाम<br>कु. लीना निळकंठराव उराडे | 209 |
| 66. | खेळात भाषेचे महत्त्व<br>डॉ.कैलास इंगळे | 214 |
| 67 | महात्मा फुले यांच्या विचारातील साहित्यप्रवाह<br>प्रा. मोहन सौंदर्य | 216 |
| 68 | वाचनसंस्कृतीच्या विकासातील अडसर व उपाय<br>श्रीमती. संगीता शेषराव नाटकर | 219 |

Scanned with CamScanner

ODMNCISPS ISSN No. - 2348-2702, Impact Factor : 3.0498, Vol. II, 2nd March 2019

# मराठी कादंबरीवरील जागतिकीकरणाचा परिणाम

प्रा. डॉ. सदाशिव सरकटे

(मराठी विभाग प्रमुख) कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर,गढी ता.गेवराई

समाजामध्ये लक्षणीय परिवर्तन, सामाजिक परिस्थितीत बदल, शिक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान, राजकारण इत्यादींमुळे तळागाळातील माणूस जागृत होतो. या सर्वांचे पडसाद जीवनाच्या सर्वच क्षेत्रात कमी-अधिक प्रमाणात उमटतात. हक्काची नवी जाणीव झालेला हा उपेक्षित समाज आपल्या हक्कासाठी लढा पुकारतो, आपल्यावर झालेल्या अन्यायाची दाद मागतो अज्ञानामुळे भोगावे लागणारे दारिद्रय, दारिद्रयामुळे होत असलेले त्याचे शोषण आणि शोषणामुळे उत्पन्न होणारे दुःख याला विविध मार्गांनी प्रकट करीत असतो. विशेषतः शिक्षणामुळे ज्या तरूण पिढीला आत्मभान प्राप्त झालेले असते अशी सुशिक्षित तरूण पिढी या प्रकटीकरणामध्ये आघाडीवर असते. ही तरूण पिढी एका अंगाने रचनात्मक कार्यावर भर देत असते आणि दुसऱ्या अंगाने आपल्या कोंडलेल्या दुःखाला साहित्य आणि कलांच्या माध्यमातून व्यक्त करीत असते. साहित्य आणि समाज यांचा संबंध अविभाज्य स्वरूपात असल्याने साहित्यामध्ये स्वाभाविकच या बदलत्या समाज जीवनातील नानाविध हुंकार उमटत असतात. ते या मध्यवर्ती साहित्याला नवे सामर्थ्य देत असतात. एक नवी वाट दाखवीत असतात. सातत्याने आणि जोरकसपणे अशा नव्या जीवनजाणीवांचा आविष्कार होत राहिला तर त्यातूनच एक वाङ्मयीन प्रवाह निर्माण होतो.

इतिहासाचा प्रारंभच भाकरीसाठी, भाकरीतून व भाकरीकडेच होत असल्याचे वास्तव आहे. म्हणूनच भारतीय सामाजिक इतिहास हा शेतीच्या लुटीच्या प्रगत साधनांचा इतिहास असल्याची नोंद आहे.[१] शेतीतील अतिरिक्त उत्पादनावर ताबा मिळविण्याचे अनेकविध प्रकार आजपर्यंत झाले आहेत. म. जोतिबा फुले यांनी आपल्या शेतकऱ्याचा आसूड मधून आणि एकूणच त्यांनी त्यांच्या 'सत्यशोधकी' विचारांची मांडणी करताना एक निश्चित क्रम लावून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. उघड उघड लूटालूट करणारा काळ, त्याला इतिहासाने 'टोळीयुग' म्हटले आहे. त्या त्या टोळीयुगातून साकारणारी लूटमारीची प्रगत अवस्था म्हणजे सक्तीची वसुली, खंडणी करसारा वसूल करणारी राजेशाही व्यवस्था. त्या त्या सक्तीच्या वसुलीसाठी आवश्यक असणारी प्रशासकीय यंत्रणा आणि सैन्याची बांधणी. शेतीच्या या अतिरिक्त उत्पादनातील मोसमी पावसाची अनियमितता उत्पादकाला शेतकऱ्याला गुलामगिरीत ढकलण्यास कशी कारण होत गेली याची हृदयद्रावक वर्णने म. जोतिबांनी मांडली आहेत.[२] एकूणच शेतकऱ्यांच्या लुटमारीच्या व्यवस्थेचा इतिहास आदिम काळापासून ते आजच्या वर्तमान काळापर्यंत आहे. शेतकरी आणि त्याची शेती - व्यवसाय हा लूटमारीचे कारण ठरलेला आहे. बळी - वामन, विद्या - अविद्या, भटशाही - कुणबी हीच शोषण - शोषितांची मांडणी भारत - इंडिया या स्वरूपातून त्यांनी सिद्ध केलेली आहे. या शोषणाच्या संबंधात 'इतिहास, संस्कृती आणि साहित्य गुलामांचे नसते. इतिहास - संस्कृती गुलामांच्या घामातून, कष्टातून तयार होतात. पण त्या त्यांच्या सुखासाठी व जेतेपण टिकविण्यासाठी...... यात पिढ्यानपिढ्यांची गुलामी कष्टणाऱ्या शेतकऱ्यांच्या माथी मारलेली दिसते. शेतीतून अतिरिक्त धान्य निर्माण झाले तरच दुसरा अन्य निघालेल्या धान्याच्या अतिरिक्त मुठीतूनच उद्योग, व्यापार, किल्ले, गढ्या, मंदिरे व लढाया झाल्या पण इतिहास लिहिला गेला, तो शेतीबाह्य कारणांच्या परिणामाचा, लुटालुटीचा, गुलामगिरीचा, वेठबिगारीचा, लुटणाऱ्या दरोडेखोरांचा, राजांचा, लुटलेल्या संपत्तीच्या कैफाचा, अवतीभोवती जमणाऱ्या भटांचा, शाहिर- पुरोहितांचा, नर्तकीच्या नाच-गाण्याचा आणि यालाच संस्कृती संस्कृती म्हणून ऊर बडविणारांचा. पण ह्या सगळ्या मागील संपत्तीच्या निर्मात्याचा त्याच्या कष्टाचा, घामाचा इतिहास लिहिणारे, बखरी लिहिणारे हे शेतकरी समाजातील नव्हते. शेतीच्या लुटीवर पोसल्या जाणाऱ्या राज्यकर्त्या पुरोहित, व्यापारी आदी परपुष्टांचे हस्तक, दलाल होते. म्हणून शेतकऱ्यांचे साहित्य - कला निर्माण होऊ शकल्या नाहीत. आज एकूणच मराठी साहित्यात शेतकरी कुठे आहे? हा प्रश्न निर्माण होतो. आजच्या या वर्तमान वाङ्मयीन प्रश्नाला, अशाच आशयाचा इतिहास आहे.

''या देशाचं दारिद्रय मूळ कोरडवाहू शेतीमध्ये आहे. आणि शहरी भागातील दारिद्रय हे ग्रामीण भागातील दारिद्रयाचाच परिणाम आहे. शेतीच्या शोषणातून झालेल्या औद्योगिकीकरणाचा पहिला फटका स्वाभाविकपणे शेतीवर कष्ट करणाऱ्या शेती व्यावसायिकांनाच बसला. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक तसेच राजकीय श्रेष्ठत्वाचा नवा आविष्कार औद्योगिक पट्ट्यातच एकवटू लागला. पोटं हाती घेऊन शेतकरी शहरांकडे धावू लागले. नवशिक्षित शेती व्यवसाय सोडून कामगार म्हणून मिळेल तिथल्या झोपडपट्ट्यात राहू लागले. राष्ट्राची गरीबी लोकसंख्या वाढवते, यामुळे लोकसंख्येचा प्रश्नही बिकट, विदारक बनत चाललेला हेही सत्य लक्षात घेण्यासारखे आहे. तर स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकारण सेवाभावी बनण्याऐवजी सत्तालक्षी बनले. या सगळ्या विपरिततेला साहित्यात स्थान दिलेले दिसत नाही आणि जे काही साहित्य लिहिले, त्यातील लेखकाची मानसिकता प्रमाण मानल्या गेलल्या व्यवस्थेमुळे आणि पारंपरिक साहित्याच्या तथाकथित मूल्यभावाशी परभृतपणे सामोरे झालेले दिसते हेही आता लक्षात घेतले पाहिजे.''[३]

१९९० नंतरच्या काळातील शेतीक्षेत्राचे चित्र अधिक भयावह आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा शेतीक्षेत्र असताना शेती



Scanned with CamScanner

उत्पादनाच्या वृद्धीशी निगडित असते. असे असताना शेती उत्पादनाकडे कमालीचे दुर्लक्ष झाले. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन मंदावले आहे. सेझसाठी पिकाऊ जमीन देऊन उत्पादन घटविण्याचे षडयंत्र रचले आहे. उत्पादनाची सारी साधने गमावून बेरोजगार झालेली माणसे म्हणजे उखडलेली माणसे आत्मसन्मानाने जगणार कशी? हा प्रश्न त्यांना भेडसावतो आहे. १९९० नंतरच्या काळातील शेतीचे स्वरूप कमालीचे बदलले आहे. 'सेझ' नावाच्या राक्षसासाठी पिकाऊ जमीन जात आहे तर उर्वरित शेतीकडे शासन गुंतवणूक क्षेत्र म्हणून पाहणार नाही. परिणामी शेतीची दूरावस्था आणि शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झाली आहे. शेती हा परवडणारा व्यवसाय नाही असे शासनकर्त्या आणि बिगर शासनकर्त्या सर्वच पक्षांचे मत सार्वत्रिकपणे मांडले जाते. त्यामुळे या दशकात शेतीक्षेत्र, शेतकरी, शेतीवर अवलंबून असलेले सर्व घटक कमालीचे दुर्लक्षित आहेत. शेतीकडे केवळ दुर्लक्षित नाही तर या क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांचे शोषण सर्व स्तरावर होत आहे. शेतीक्षेत्र विकसित करण्यासाठी नव्या योजना, नवी धोरणे आखली जात नाहीत. उलट भांडवली गुंतवणूक संपुष्टात आणली आहे.''४

पाणी - वीज यांचे दुर्भिक्ष्य, त्यातून आलेली नापिकी, नापिकीतून कर्जबाजारीपणा, पिकलेल्या शेतीमालासाठी उत्पादन खर्चाप्रमाणे न मिळणारे भाव, त्यातून जगण्याची उमेद हरवून बसलेले शेतकरी, त्या शेतकऱ्यांना न मिळणारी आत्मसन्मानाची वागणूक यातून ग्रामीण समाजात आलेली अस्वस्थता ही अवस्था भयंकर आहे. उद्योगाच्या आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हाती एकवटलेली सत्ता बिग बाजाराला आलेले महत्त्व, शिक्षणाचे झालेले बाजारीकरण, संस्कृतीच्या नावाने वाढलेली स्वार्थी प्रवृत्ती या सर्वांच्या आधारे समाजात आलेले स्थित्यंतर आणि शेतीसंबंधी अनास्था वाढत आहे. शेतीच्या मूळ प्रश्नांना बगल, शेतकरी आणि त्यांच्याशी संबंधित घटकांना अस्मितेचे, मानवतेचे प्रश्न आस्थेचे वाटणे, त्यासाठी तीव्र संघार्षाची तयारी असणे धोक्याचे आहे. मॉर्डनिटीचा आव आणीत ट्रॅडिशन कवटाळण्याचे धोरण अवलंबिले. त्यामुळे युगधर्माचे भान हरवले आहे.

सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक बाबतीत आलेली अस्थिरता, वर्तमान वास्तवापासून दूर जाऊ पाहणारी समाजाची मानसिकता यातून मूळ प्रश्नाची सोडवणूक अशक्य वाटते. या साऱ्या नकारात्मक स्थिती गतीशी ग्रामीण माणूस सामना करतो आहे. तोही पराभूत मनोवृत्तीनेच त्याचा अन्वयार्थ त्याच्या भोवतीचे अवकाश समजून घत लावावा लागेल. आजही ग्रामीण भागातील मूळ प्रश्न कायम आहेत. नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यात पुन्हा भर टाकण्याचे काम नवी यंत्रणा, नवी व्यवस्था करते आहे. शेती आणि शेतकरी यांच्यात येणारे परिवर्तन केवळ प्रश्नांचेच आहे. बाकी शेती, शेती क्षेत्राशी संबंधीत लोक आणि शेतकरी आहेत तसेच आहेत. परिवर्तन झालेच असेल तर रस्ते बदलले, पाणी आटले, घरे जुनी झाली. विजेचे लोडशेडींग वाढले. शेतीवर बिल्डर, उद्योजक, व्यापारी, सावकार यांचे डोळे लागले, शेतकऱ्याचे सारे लुटले गेले आहे. कामासाठी शेतीवरची माणसे विस्तापित झाली. हे परिवर्तन स्वाभिमान आत्मसन्मान हिरावून घेणारे आणि आत्मनाश ओढवून घोणारे आहे. हे भान साहित्यातून १९९० नंतरच्या काळात आविष्कृत झाले आहे.

माणसाचे मूल्य संपवणारी यंत्रणा आणि व्यवस्था माणसामध्ये कोरडेपण आणत आहे. मूल्यहीन सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थितीचे गांभीर्य साहित्य सृजनाला नाही अशी तक्रार डॉ. भा. ल. भोळे यांची आहे ते लिहितात, ''घसरत्या आर्थिक राजकीय परिस्थितीने व झपाट्याने विस्तारलेल्या प्रसारमाध्यमांनी मुख्य प्रवाहातील साहित्यालाही नासवले आहे. प्रसिद्धी साधने विपुल वाढली, मासिके वाढली, दिवाळी अंकाचा धंदा तेजीत आला, पूर्णवेळ मराठी दूरदर्शन मालिकांच्या संख्येत भर पडली, लेखकांना मागणी वाढली, मानधनाचे आकडे फुगले, नव्या अर्थव्यवस्थेमुळे मध्यमवर्गाचा विस्तार झाला त्याच्या सुखवादी जीवनशैली रूचेल पचेल असेच साहित्य दुथडी भरून प्रकाशित होत राहिले. त्यामुळे तथाकथित मुख्य प्रवाहातील साहित्याच्या क्षेत्रातही या काळाचे वर्णन 'ऱ्हासपर्व' असेच करावे लागेल. अक्षरशः अतोनात म्हणता येईल एवढे साहित्याचे उत्पादन त्यात होत असूनही ज्याला गंभीर साहित्य सृजन म्हणता येईल, त्याचे प्रमाण नगण्य आढळते. बाजारपेठीय मागणीनुसार पुरवठा करता तद्दन चिल्लर अनुभवांना व वरवरच्या ताणतणावांना घेऊनच तिथेही बहुतेक लेखन केले जाते.''५

१९९० नंतरच्या काळातील साहित्याचे स्वरूप अधिक सशक्त आहे. आपल्या भोवतीचे समाजवास्तवाचे आकलन आणि त्याचा अन्वयार्थ या साहित्यातून आविष्कृत झाला आहे. जातिव्यवस्था त्याज्य आणि लज्जास्पद आहे ही भावना संपुष्टात येऊन जातिव्यवस्थाच महत्त्वाची ठरविणारा हा काळ आहे. जातीच्या चौकटीत सारी विधायक व्यवहार्यता भरली आहे. आणि स्वातंत्र्य - समता - बंधुता - सामाजिक न्याय यांचा केवळ उदघोष करायचा असतो हे समाजाने पक्के केले, त्यामुळे अस्तित्वाचे प्रश्न गुंतागुंतीचे झाले. जगण्याचे प्रश्न जातीभोवती फिरायला लागले. विद्रोह, नकार, आत्मभान, आत्मसन्मान हे मानवी दृष्टीकोन जीवनशैलीचा भाग बनले सारे समूह त्याच दिशेने निघाले. १९९० साली या व्यवस्थेला जागतिकीकरणाने गाठले. सारी संस्कृतीच धोक्यात आहे अशी हाकारी पिटवली गेली. भाषा, प्रदेश, आणि जात यातून अस्मिता जागृत केल्या गेली. आपल्या संस्कृतीवर आक्रमण होत आहे. संस्कृतीची विशिष्टता नष्ट होत आहे. या भावना प्रबळ झाल्या आणि स्वयंसंस्कृतीबद्दलचा पूज्यभाव व्यक्त करण्याची स्पर्धा सुरू झाली. त्यासाठीचा आवेश व्यक्त झाला नेमका याचाच फायदा सांस्कृतिक राजकारणासाठी करण्यात आला. समूह भावनेचे स्वरूप त्याला प्राप्त झाले. मराठी कादंबरीने हेच स्वरूप आपल्यामधून साकार केले या संदर्भात डॉ. हरिश्चंद्र थोरात म्हणतात, ''कादंबरीच्या केंद्रस्थानी समूह आला की, त्याला बांधणारे एखादे सूत्र कादंबरीत येणे आवश्यक असते. हा समूह काही योगायोगाने एकत्र आणण्याच्या हेतून कोणती सूत्रे वापरली, हे पाहू गेले तर काय आढळते? विशिष्ट जात, विशिष्ट अवकाश व्यापणारी सामाजिक संस्था या सूत्रांनी कादंबरीतून सांगितला जातो. कुणबी, मराठा, मांग, विशिष्ट शाखेचे ब्राह्मण, कोळी यासारख्या विविध जाती जमातींच्या जगण्याचे, रीतीरिवाजांचे सांस्कृतिक परंपरांचे चित्रण समृद्ध भावनेने केले जाते.''६ परिणामी संस्कृतीचे वर्तमान धोक्यात आल्याच्या भावनेने अस्मिता महत्त्वाची ठरू



Scanned with CamScanner

लागली. समाजवास्तवाची गुंतागुंत अस्मितेच्या मार्गाने अधिक सरळधोपट झाली. शेती तथा शेतकरी यांच्या प्रश्नांना हवी असलेली उत्तरे अस्मितेमधून शोधता येत नाहीत. त्याची उत्तरे सामाजिक-आर्थिक-राजकीय दृष्टिकोनात असतात. नव्या जगाची रचना त्या दृष्टीने समजून घ्यावी लागते हे अपवादानेच घडले आहे.

१९९० नंतर ग्रामीण जीवनात बदल घडून आला. तसे, वेगवेगळे प्रश्न निर्माण होऊ लागले. त्या प्रश्नांना, समस्यांना ग्राम जाणिवेच्या लेखकांनी त्यांच्या वाङ्मयातून मुखरित केले आहे. ग्रामीण माणसाला लागणारी धग आणि वर्तमान ग्रामवास्तव ग्रामीण साहित्यातून येऊ लागले. १९९० नंतर समग्र जीवनच बदलू लागले. शहरे फुगू लागली. खेडी प्रश्नांच्या शोषणाच्या, दारिद्र्याच्या चाकात भरडायला लागली. जागतिकीकरणाचा हा परिणाम जसा गावगाड्यावर झाला तसा साहित्यावरही झाला. या बदलाचा वेध काही संवेदनशील लेखकांनी घेतला आहे.

ग्रामीण माणूस, निसर्ग, शेती, पशू-पक्षी यांच्या जगण्यातले ताणतणाव याचे चित्रण बाबाराव मुसळे यांनी 'हाल्या-हाल्या दूधू-दे' (१९९५) पखाल वारूळ, यातून ग्रामीण माणसाचे दुःख, दैन्य, शोषण यांचे चित्रण ते करतात. त्यासोबतच ग्रामीण माणसाचे ताणतणाव आणि त्यांच्यातील माणूसपण संपत चालल्याची नोंदही ते करतात. विदर्भातील वऱ्हाडी बोलीत कादंबरी लेखन करणारे सदानंद देशमुख यांनीही बदलते ग्रामवास्तव आणि शेती तथा संस्कृतीशी निगडित ताणतणाव, समस्या साहित्यातून मांडल्या आहेत. तहान (१९९८), बारोमास (२००२) या कादंबऱ्यातून खेडयातील बेकारी, अभावग्रस्तता, फसवणूक, दारिद्र्य, पाणीप्रश्न, शेतकऱ्याची होणारी लूट, दैन्य, अज्ञान, अंधश्रद्धा, निसर्गाचा लहरीपणा, भ्रष्ट व्यवस्था अशा विविध ग्रामवास्तवाचे पदर ते अविष्कृत करतात.

वर्तमान ग्रामवास्तवाचा वेध घेणाऱ्या लेखकांमध्ये प्रकाश देशपांडे हे महत्त्वाचे नाव आहे. त्यांची 'बारदाना' ही कादंबरी ग्रामीण किडलेले राजकारण आणि नीतीमूल्यांचा संघर्ष समर्थपणे अभिव्यक्त करते. १९९० नंतरचे बदलते ग्रामीण जीवन आपल्या साहित्यातून अभिव्यक्त करणाऱ्या राजन गवस यांच्या १९९८ ला प्रकाशित झालेल्या 'तणकट' कादंबरीमधून दलित समाजाचे नेतृत्व करणाऱ्या स्वार्थी नेत्यांच्या मतलबी नेतृत्वाचे चित्रण होते. भारत काळे यांची 'एसे कुणबी भुपाळ' ही कादंबरीही कृषिसंस्कृतीचे नेमकेपणाने आविष्करण करते. डॉ. रमेश अंधारे यांच्या पागोरा कादंबरीतून शेतकऱ्यांचे दारिद्र्य शेतीमुळे, क्यो दारिद्र्य आलं तरी शेती, माती जपली पाहिजे अशा विचाराचा बाप नोकरीसाठी वणवण भटकणारा मुलगा असा बेकारी आणि दारिद्र्याचा संघर्ष यातून येतो.

विकासाची दिशा नीट न कळल्यामुळे, शासनाच्या गैरादीपणात घेतले जाणारे निर्णय एखाद्या योजनेचा कसा बोजवारा वाजवतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे रमेश इंगळे उत्रादकर यांची 'निशाणी डावा आंगठा' (२००५) ही कादंबरी उपरोधिक आणि विनोदी शैलीत शिक्षण अभियानातून निर्माण झालेले खेड्यातील नाट्य चित्रित करते. प्रतिमा इंगोले यांच्या 'बुढाई' व 'पार्टटाईम' या दोन कादंबऱ्यांमधून स्त्रीजीवनाचे वेगवेगळे पैलू आविष्कृत होतात. स्त्रीचे शोषण आणि कुचंबना या कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी आहे. डॉ. रा. गो. चवरे यांच्या 'आरंबळ' (२००५) या कादंबरीतून ग्रामीण शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचाराचे आणि भुकेचे चित्रण होते. 'एसईझेड' ही शंकर सखाराम यांची कादंबरी सेझ प्रश्नावर महत्त्वाचा प्रकाश टाकणारी आहे. अशोक कौतिक कोळी यांची 'पाडा' ही कादंबरी केळीचे उत्पादन आणि त्या उत्पादनाला योग्य भाव न मिळणे, त्यातून कुटुंबात निर्माण होणारे प्रश्न असा पट चित्रित करते. भारतीय केळी उत्पादक शेतकऱ्याची हतबलता यातून अभिव्यक्त होते.

## संदर्भ


१. नलगे चंद्रकुमार (संपा.), ग्रामीण वाङ्मयाचा इहितास (शेतकरी साहित्य : एक नोंद - प्रा. भास्कर चंदनशिव) सुरेश एजन्सी, पुणे, १९९६, पृ. २२३.
२. कीर धनंजय / मालसे स. गं. (संपा.), महात्मा फुले समग्र वाङ्मय.
३. नलगे चंद्रकुमार (संपा.), ग्रामीण वाङ्मयाचा इहितास (शेतकरी साहित्य : एक नोंद - प्रा. भास्कर चंदनशिव) सुरेश एजन्सी, पुणे, १९९६, पृ. २३३.
४. कवडे श्रीकृष्ण / काळे रावसाहेब, समकालीन ग्रामीण साहित्य, (डॉ. विठ्ठल वाघ गौरवग्रंथ), पृ. ६९.
५. भोळे भा. ल., सत्तरीनंतरचे सामाजिक बदल आणि मराठी साहित्य, प्रतिष्ठान, सप्टें-ऑक्टो. २०००.
६. थोरात हरिश्चंद्र, गेल्या पंधरा-वीस वर्षातील मराठी कादंबरीचे स्वरूप, दिवाळी अंक, २००८.




Scanned with CamScanner